महाज्योती

महाराष्ट्र शासन

इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022
दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com

## MHT-CET/JEE/NEET - 2025 योजनेचा तपशील

महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्गीय, भटक्या जाती-विमुक्त जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून MHT-CET/JEE/NEET - 2025 करीता पुर्व प्रशिक्षण या योजने अंतर्गत अर्ज मागविण्यात येत आहे. महाज्योती मार्फत MHT-CET/JEE/NEET परिक्षा पुर्व प्रशिक्षण ऑनलाईन पद्धतीने देण्यात येते. तसेच ऑनलाईन प्रशिक्षणासाठी महाज्योती तर्फे विद्यार्थ्यांना मोफत टॅब व 6 GB/Day इंटरनेट डाटा पुरविण्यात येते.

### अ. योजनेच्या लाभासाठी पात्रता:

1. उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा/असावी.
2. उमेदवार हा इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती-भटक्या जमाती किंवा विशेष मागास प्रवर्ग यापैकी असावा/असावी.
3. उमेदवार हा नॉन-क्रिमिलेअर उत्पन्न गटातील असावा/असावी
4. जे विद्यार्थी सन - 2023 मध्ये 10 वी ची परिक्षा देत आहेत ते विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र असून त्या विद्यार्थ्यांनी अर्ज करतांना 10 वी चे प्रवेश पत्र व 9 वी ची गुणपत्रिका जोडावी.
5. विद्यार्थी हा विज्ञान शाखेत प्रवेश घेणारा असावा. ज्या बाबतची कागदपत्रे त्याने भविष्यात सुचनांनूसार अपलोड करणे आवश्यक आहे.

### ब. अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे:

1. 9 वी ची गुणपत्रिका
2. 10 वी परिक्षेचे ओळखपत्र
3. आधार कार्ड
4. रहिवासी दाखला
5. जातीचे प्रमाणपत्र
6. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र

### क. अर्ज कसा करावा.

1. महाज्योतीच्या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील "Application for MHT-CET/JEE/NEET - 2025 Training" यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
2. अर्जासोबत "ब" मध्ये नमूद कागदपत्रे स्वाक्षांकीत करुन स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन अपलोड करावे.

Scanned with CamScanner

# दहावीच्या विद्यार्थ्यांना नीट, सीईटीचे मोफत प्रशिक्षण ; ३१ मार्चपर्यंत करा अर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

**भंडारा :** महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्गीय, भटक्या विमुक्त जाती-जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय आणि अभियांत्रिकीच्या क्षेत्रातील शिक्षणासाठी महत्त्वाच्या नीट, सीईटी परीक्षेचे मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडून हे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांना मोफत टॅबसोबत इंटरनेट सुविधाही पुरविली जाणार आहे.

यंदा दहावीची परीक्षा देत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही योजना असून, यासाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ३१ मार्चपर्यंत या प्रशिक्षणासाठी अर्ज करण्याची मुदत देण्यात आली आहे.



## महाज्योती योजना : नीट, सीईटीचे मोफत प्रशिक्षण

- इतर मागासवर्गीय, भटक्या विमुक्त जाती-जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील बहुतांश विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे. त्यामुळे हुशार व अभ्यासाची आवड असूनही ते नीट, सीईटीचे महागडे खासगी क्लासेस लावू शकत नाहीत. अशा विद्यार्थ्यांसाठीची महाज्योती योजना महत्त्वपूर्ण ठरत आहे.

## कोणते विद्यार्थी पात्र?

ही योजना इतर मागासवर्गीय, भटक्या विमुक्त जाती-जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी आहे. जे विद्यार्थी सध्या दहावीची परीक्षा देत आहेत, त्यांना यासाठी अर्ज करता येणार आहे.

## ही कागदपत्रे आवश्यक

या प्रशिक्षण वर्गासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांकडे नववीच्या परीक्षेचे गुणपत्रक, दहावी परीक्षेचे हॉल तिकीट, रहिवासी दाखला, आधार कार्ड, जातीचे प्रमाणपत्र व नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र आवश्यक आहे.

## घरबसल्या करा ऑनलाईन अर्ज

प्रशिक्षणासाठी महाज्योती संस्थेच्या https://mahajyoti.org.in या अधिकृत संकेतस्थळावरून अर्ज करता येतो. यासाठी आवश्यक कागदपत्रे आपल्याकडे असणे गरजेचे आहे.

## ३१ मार्चपर्यंतची मुदत

या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ३१ मार्चपर्यंत या प्रशिक्षणासाठी अर्ज करण्याची मुदत देण्यात आली आहे.

## प्रशिक्षणासाठी टॅबही मोफत

पात्र विद्यार्थ्यांना नीट, सीईटी परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण व या परीक्षेच्या अभ्यासासाठी महाज्योती संस्थेकडून मोफत टॅब देण्यात येणार आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण मिळणार आहे.

Scanned with CamScanner